महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचलित ,

# महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

## धुळे रोड, ता.चाळीसगाव, जि. जळगाव.

## बी.एड. ( प्रथम वर्ष )

## शैक्षणिक वर्ष ( २०२२- २०२३ )

विद्यार्थी शिक्षकाचे नाव :- जोशी मयुरी विजय

रोल नं. :- ५६

विषय :- अभ्यासक्रमांतर्गत भाषा आणि ज्ञान व अभ्यासक्रम

प्रात्यक्षिक विषयाचे नाव :- स्थानिक प्रदेशातील बोलीभाषेचा अहवाल तयार करणे ( नंदुरबारी बोलीभाषा )

मार्गदर्शक प्राध्यापकाचे नाव :- प्रा.लता परदेशी

# अनुक्रमाणिका


| अनु. क्र. | प्रकल्पाचे मुद्दे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना. | १ |
| २. | नंदुरबारी भाषेचा उगम. | ३. |
| ३. | नंदुरबारी बोली भाषेचा विकास व विस्तार. | ६. |
| ४. | नंदुरबारी बोली भाषेचे वैशिष्ट्ये. | १०. |
| ५. | नंदुरबारी बोली भाषेचे घटक. | १२. |
| | १] भाषेचे कथानक. | |
| | २] भाषेतील संवाद. | १४. |
| | ३] म्हणी व त्यांचे अर्थ. | १५. |
| | ४] लोकगीते. | १७. |
| | ५] पक्ष्यांची नावे. | 22. |
| | ६] जनावरांची नावे. | 23. |
| | ७] फळांची नावे. | 24. |
| | ८] ऋतुंची नावे. | 25. |
| | ९] भाज्यांची नावे. | 26 |
| | १०] सण व उत्सव. | |
| ६. | नंदुरबारी भाषेचे महत्त्व. | |
| ७. | समारोप. | |
| ८. | प्रमाणपत्र. | |


Sundaram FOR EDUCATIONAL USE

# प्रकल्प

## स्थानिक प्रदेशातील बोली भाषेचा अहवाल तयार करणे

नंदुरबारी भाषा

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

मानवाला एक छान असे भाषेचे वरदान मिळाले आहे. या वरदानाच्या आधारे मानवाने विविध क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. संचित असे ज्ञान पुढील पिढीला मिळावे. तसेच पुढील पिढीने ज्ञानात अधिक भर घालावी. त्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मानवाने शिक्षणव्यवस्था निर्माण केली.

भाषा ही विविध प्रकारे बोलली जाते. जसे गाव बदलले की, भाषा ही आपोआप बदलते. वेगवेगळ्या प्रकारची भाषा आपण ऐकतो. भाषांच्या अनेक जाती आहेत. व काही भाषा आपण वापरत असतो.

भाषेचे कुतूहल प्राचीन काळापासून माणसाला वाटत आहे. अगदी पूर्वीपासूनच लोकपरंपरेत भाषेच्या उगमाबद्दल, शक्तीबद्दल विविध काहण्या, प्रचलित होत्या. तो त्या कुतूहलाच्या पूर्वीचा प्रयत्न होता.
भाषा हे आपल्या अंतरंगातील मनोगत, भावना, विचार इ. प्रगट करण्याचे साधन आहे, हे प्रयत्न आधुनिक कालखंडात विशेषत्वाने होऊ लागले. त्यातून भाषाविज्ञान ही ज्ञानशाखाही विकसीत होत गेली. बदलत्या काळानुसार भाषेत बदल होत गेल्याचे आपणास दिसून येते. भारतात वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक राहतात. व त्यांची भाषाही वेगवेगळी असते. मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे मानवी सभ्यतेच्या विकासाचे साधन भाषेला मुख्य साधन मानले जाते.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## "भाषा म्हणजे काय?"

"मानवी मनातील विचार व विकार प्रगटीकरणाचे ध्वनिरूप मौखिक साधन म्हणजे भाषा होय."

"परस्परांशी विचारांचे, भावनांचे आदान-प्रदान करण्यासाठी स्वीकारलेले मौखिक शब्दरूप साधन म्हणजे भाषा होय."

मानवी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्र या भाषेच्या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. भाषा ही विविध प्रकारांनी मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून असल्याने तिच्या कडे पाहण्याच्या विविध रीती दृष्टीकोन संभवतात.

ज्या आपण प्रादेशिक व आपल्या समाजापुरत्या मर्यादित असतात. दर २५ किमी वर होणाऱ्या भाषेतील बदल देखील आपल्याला समजतो अशा भाषांना त्या प्रदेशाच्या बोलीभाषा म्हटल्या जातात.

महाराष्ट्रात नंदुरबारी, भिल्ल, लावडी, पावरी, वऱ्हाडी. अशा अनेक भाषा दिसुन येतात. त्यातील आहिराणी ही एक बोलीभाषा आहे. त्याविषयीची माहिती मी या प्रकल्पा-द्वारे तुम्हांला देत आहे. आपल्याला माहित नसलेल्या बऱ्याच गोष्टीची यात माहिती मिळेल याची मला खात्री आहे.

Sundaram

FOR EDUCATIONAL USE

# बोलीभाषेचा उगम

अहिराणीचा उगम इ.स. २०० च्या आसपास झाला असावा ती खान्देशी (अहिराणी) ही खान्देश प्रदेशातील बोलली जाणारी भाषा आहे. जळगाव, धुळे, आणि नंदुरबार हे तीन जिल्हे औरंगाबाद जिल्हातील कन्नड तालुक्याचा काही भाग आणि नाशिक जिल्ह्याच्या कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा या तालुक्यात ती बोलली जाते. या प्रदेशातील लोक अहिराणी बोलत असले तरीही वाचन आणि लेखन यासाठी प्रमाण मराठीचा वापरण्याचा कल आढळतो.

अहिराणीचा उगम ह ती खान्देशातच जन्माला आली. चंद्रवंशीय यादव, गोप, यांची इ.स. पाच हजार वर्षीपूर्वीची जुनी ईलावर्षी भाषा व आजची नवीन भाषा तयार झाली आहे- प्रत्येक कानाकोपऱ्यात ती बोलली जाते. मात्र त्यापैकी काही बोलीभाषाचा विकास होऊन त्या आज प्रमाणभाषा झालेल्या दिसून येतात, हा बदल आपल्याला अज्ञातच आहे, परंतु आज अहिराणी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळालेली असते. संपुर्ण भारतात जवळजवळ १८ बोलीभाषा आढळून येतात. अहिराणी महाराष्ट्राच्या नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार ह्या चार जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बोलली जात असुन तीला प्रमाण भाषेचा दर्जा प्राप्त झालेला नाही. भाषाशास्त्राने तर अहिराणी ला मराठी भाषेची एक पोट-भाषा म्हणुन तीची उपेक्षाच केलेली दिसुन येते.

भाषेचा उगम नेमका कोणत्या भाषेपासुन व कोठुन झाला याचे काही प्रमाण नाही, पण याबद्दल अनेक वेगवेगळी मत आहेत. कोणी म्हणतात वैदिक संस्कृती पासुन कोणी म्हणते संस्कृत पासून कोणाला वाटे प्रकृतापासुन तर कोणी नव्हते अपभ्रंशापासुन यासाठी ताम्रपट, शिलालेख, त्याचबरोबर दुर्मिळ असणाऱ्या ग्रंथामध्ये असलेले ऐतिहासिक उल्लेख प्राचीन कोरीव लेख, या साधनांचा अभ्यास भाषाभ्यासकांनी केला. आणि त्यातूनच भाषेच्या उत्पत्तीचा काळ शोधण्याचा प्रयत्न केला. ज्याने ज्याने आपल्याला असणारे पुरावे. पाली, संस्कृत, वैदिक या भाषांशी काहीशी साम्यपणा दिसून येते. ज्या वेळेला त्या विशिष्ट भाषेत साहित्य तयार होते. त्याचवेळी त्या भाषेला व्याकरणाच्या साच्यामध्ये बसवले जाते.

भाषेचा उगम हा पुर्वीच्या काळातल्या शिक्षणापासुनच सुरु झाला. प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तीच्या भाषेत अनेक प्रकारच्या बोलीभाषा बोलल्या जातात. या बोलीभाषा ही मुख्यत्वे आर्य-भाषा भारतीय भाषेत हळूहळू बदल होत जावून ती संस्कृत भाषेत ग्रंथरचना होण्याला सुरुवात झाली. यामुळे याच काळातील अपभ्रंश बदलावर संस्कृत भाषेचा परिणाम झाला असावा. त्यानंतर पहिले तर अपभ्रंश भाषा साधारणता अकराव्या शतकापासून वेग वेगळ्या धर्माच्या, वेगळ्या वंशाच्या वेगळ्या चालीरिती अस्तितवात आल्या. त्याचे कारण असे होते की, सन ८व्या शतकापासुन वेगवेगळ्या चालीरिती यावरून विविध भाषीकांनी भारत देशावर व चाल वंशाचे, धर्माचे हा उगम झालेला आपल्याला दिसुन येतो. बोलीभाषा हा फक्त त्या त्या प्रदेशापुरत्या अवलंबुन असतात. वेगवेगळ्या समाजाच्या लोकांच्या बोलीभाषेचा उगम हा त्याच्या मुख्य भाषापासुन

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

'मुख्य झाला आहे. थोड्या-थोड्या अंतरावर या भाषेत बदल होतो.

प्रामुख्याने काठीच्या आदिवासी संस्कृतीतली होळी ही मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. होळी ही मोठ्या प्रमाणाच्या स्वरुपात होत असून जवळ भरणाऱ्या बाजारास भोंगऱ्या बाजार असे म्हणतात.

नंदुरबार हा शंभर टक्के आदिवासी जिल्हा आहे. "याकाही नंदुरबार देवमोगरा माता' हे येथील आदिवासीचे प्रमुख टोटेम '[कुलदेवी] आहे. आहिराणी धुळे, जळगाव, नंदुरबार व नाशिक या चार राज्यात बोलली जात असली तरी तिचे बलले जाणारे स्वरुप सर्वत्र सारखेच नाहीत.

धुळे व नंदुरबार जिल्हातील आहिराणी भाषेवर गुजरातीचा प्रभाव आहे. गुजरात सीमेला लागुन असल्यामुळे हा प्रभाव नवापूर, नंदुरबार, भागात जास्त आढळते. जळगाव जिल्हातील आहिराणी भाषा वऱ्हाडी-वैदर्भी भाषेला जवळची वाटते.

अशाप्रकारे आपण भाषेचा उगम कशा प्रकारे व बोली-भाषा कोठुन उदयास येतात त्या विषयी पाहिले.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# भाषेचा विंकास आणिं विस्तार


भाषा ही मानवाला मिळालेली एक बहुमुल्य देणगी आहे. भाषेच्या माध्यमातुन प्रत्येक व्यक्ती आपल्या विचारांचे आदान प्रदान करु शकतो. संवाद साधण्यासाठी लिहीणे, वाचणे, बोलणे, इशारे, हावभाव, मुक, अभिनय, मुद्राभाव असे.

अनेक माध्यम आहेत, भाषा हे आपले विचार, मते, भावना, जीवन प्रकट करण्याचे आव्हानात्मकसाधन आहे. भाषेचा वापर करणे हे देखील एक कौशल्य आहे. या भाषेच्या विकासाच्या अनेक पायऱ्या आपल्याला दिसुन येतात.

त्यातील मुख्य चार प्रकार पडतात.

ते पुढीलप्रमाणे आहेत.

१] आकलन
२] शब्दसंग्रह
३] शब्दरचना
४] वाक्यरचना




Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# १] आकलन......

आकलन म्हणजे दुसऱ्याचे बोलणे समजुन घेणे. आकलन हा भाषा विकासाचा पहिला आणि महत्वाचा टप्पा आहे. या टप्प्यामध्ये समोरच्याला काय म्हणायचे आहे. ते आपल्याला कळते. समोरच्याच आवाजातील रागीटपणा, कोमलपणा, सारखे, भाव आपल्याला समजतात. आकलन केल्याने आपण समोरच्याच्या आवाजाचे पलन करु शकतो. मनुष्याची आकलन शक्ती ही त्या व्यक्तीच्या बौद्धिक क्षमतेवरही अवलंबुन असते, त्यामुळे प्रत्येक मनुष्याची आकलनशक्ती ही वेगवेगळी असते.

# (२) शब्दसंग्रह

शब्दसंग्रह वाढवणे म्हणजेच नवनवीन शब्दांचा साठा करणे होय. शब्दसंग्रह हे दोन प्रकारचे असतात.

१] सामान्य शब्दसंग्रह
२] विशेष शब्दसंग्रह

शब्दसंग्रहामध्ये नाम, सर्वनामे व क्रियापदांचा समावेश होतो. या शब्दसंग्रहामध्ये दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा आणि क्रियापदाचा समावेश होतो. या शब्दसंग्रहामध्ये काही नवीन शब्दांचा समावेश होतो.

त्यामध्ये व्यक्ती त्याच्या दैनंदिन जीवनातील अनुभवांमधुन काही नवीन शब्द शिकत असतो. शब्दभांडारामधुनच व्यक्तीची भाषेचा विकास दिसुन येतो. रंगाची नावे, नद्यांची नावे, विषयांची नावे इ.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

## ③ शब्दरचना (शब्दोउच्चारण) :-

शब्दोउच्चारण म्हणजे शब्दांचे उच्चारण, कानांनी ऐकलेले, आकलन, केलेले शब्द बोलण्यासाठी त्यांचे शब्द आणि वाक्यात रुपांतर करुन वाणीच्या माध्यमातुन उच्चार करणे फार महत्त्वाचे असते. शब्दोउच्चारामधुनच व्यक्तीची भाषा विकास दिसुन येतो.

## ④ वाक्यरचना :-

वाक्यरचना म्हणजे वेगवेगळे शब्द व्याकरणदृष्ट्या एकत्र करुन एखादे वाक्य तयार करणे होय. वाक्याचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये लहान वाक्ये, मोठी वाक्ये, ग्युतांग्युतीची वाक्ये, उद्गारवाचक वाक्ये, प्रश्नार्थी वाक्ये, इत्यादीचा समावेश होतो. वाक्यरचनेमधुन व्यक्तीचा भाषा विकास दिसुन येतो.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

या भाषेचा विस्तार हा महाराष्ट्रातील अनेक जिल्हांत झालेला आपल्याला दिसुन येतो. नाशिक जिल्ह्याच्या कळवण, सटाणा, मालेगाव, व देवळा या तालुक्यांत ती बोलली जाते. या प्रदेशातील लोक आहिराणी बोलीभाषा बोलतात. तरिही वाचन आणि लेखन यासाठी प्रमाण मराठीचा वापरण्याचा कल आढळतो. जुन्या खान्देश प्रदेशात म्हणजे डोंगराळ, सातपुड्याचे डोंगर, चांदवडचे डोंगर आणि वाघुर नदी या खोल खाद्याणीत वास्तव्यास असलेले लोक आहिराणी भाषा बोलतात. खानदेश परिसरातील अहिराणीच्या वास्तव्यांमुळे, सत्ते-वरील त्यांच्या प्राबल्यामुळे त्या परिसरातील सर्वांच्या बोलीवर आहिराणी बोलीची छाप पडली. यावुनच खानदेशाचे सामाजिक आणि प्रादेशिक प्रभेद झाला आहे.

प्रवेशानुसार बागलाणी, नंदुरबारी, खाल्यांगी, वल्यांगी, ताप्तांगी डोंगरांगी, जामनेरी हे बोलीभाषेतील प्रादेशिक प्रदेशात तर जातिवाचक बोली ह्या सामाजिक प्रदेशात मोडतात. जवळपास ९५% टक्के खानदेशी माणसे आहिराणी बोलतात. ती त्यांची बोलीभाषा आहे. जळगाव, नंदुरबार, धुळे, औरंगाबाद तथा नाशिक जिल्ह्याच्या काही भागात आहिराणी भाषा बोलतात. उत्तर महाराष्ट्र अमळनेर, साक्री, पारोळा, दोंडाईचा, शिरपुर, तळोदा, शहादा, धडगाव, नवापुर, नंदुरबार, धुळे, जळगाव, अक्कलकुवा, सिंदखेडा, चोपडा, एरंडोल, चाळीसगाव, भडगाव, पाचोरा, कळवण, सटाणा, मालेगाव, देवळा, बागलाण ह्या तालुक्यातील बहुतेक सर्व जाती जमातीची ही मायबोली भाषा आहे.


अशाप्रकारे भाषेचा विस्तार झालेला आपल्याला दिसुन येतो.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# भाषेचीं वैशिष्ट्ये :

भाषेची अभिव्यक्ती मौखिक व लिखित अशा दोन्हीही पद्धतीने होते. मौखिक भाषा जेव्हा लिपीबद्ध केली जाते, ती तेव्हा लिखित स्वरुपात येते. लिखित भाषा उपयोग समाज व संस्कृतीच्या संवर्धनासाठी केला जातो. आपला वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविण्याचा सोपा मार्ग म्हणजे लिखित भाषा होय.

जनमानसात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेची काही वैशिष्ट्ये असतात, पुढीलप्रमाणे :-




Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

## १) अनुकरणशीलता

बालकाचा जन्म झाल्यावर आपल्या घरातील भाषेचेच ते अनुकरण करते. घरात बोलली जाणारी भाषा बालक ऐकते, बोलायला शिकते. घरातही त्याच्या कानावर पडणारे बोल साधारणत: मातेचेच असतात. बालकाच्या मातृभाषेचा उगम येथे होतो. घरानंतर ते बालक शेजारी होते. तेथेही भाषा ऐकते, बोलते, त्याचेही अनुकरण करते. भाषाशिक्षणाचे हे अनुकरण शाळेमध्येही सुरूच असते. म्हणुन 'शिक्षक' या नात्याने आपण वैशिष्ट्याची दाखल घेणे आवश्यक आहे.
बालकाला आपण जे बोलणे शिकवले असते, बालक तसेच अनुकरण करते.

## २) भाषा समाज सापेक्षता....

भाषा ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. परंपरेनुसार चालत आलेली भाषा व्यक्ती बोलतो. समाजात काळानुसार भाषेचा विकास होतो. एकीकडे व्यक्ती समाजाकडून भाषा शिकतो, दुसरीकडे भाषेमुळे समाजाचा विकास होतो.

## ३) भाषेची परिवर्तनशीलता......

देशाला स्थितीनुसार भाषेतही परिवर्तन होत असते. भाषेतील परिवर्तन ध्वनी, शब्द, पदबंध तसेच वाक्यरचनेतच्या संदर्भात होते. भाषेच्या या बदलत्या स्वरूपामुळे असे म्हणता येते की भाषेच्या एकच एक रूप किंवा अंतिमरूप नसते. तसेच बोलीभाषा देखील परिवर्तन झालेला दिसुन येतो.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# ⑤ भाषेचे घटक :-

## ① भाषेचे कथानक

### डुकरंन वाघले आव्हान !

डुकरंसले कायम गंधा म्हणतस; पण जुना काळमा त्या तसा नव्हतात. जंगलमधला बाकीना प्राणीसमान त्या बी स्वच्छ राहेत. पण डुकरं गंधा कसा व्हयनात त्यानी एक मजेशीर गोष्ट शे. मेघालयना जंगलमा सर्व जनावर खेळीमेळीना राही राहीतात. जंगलमा सर्वासले भरपुर खावाले-पेवाले बरच व्हत. एक दिन वाघ शिकार कराले निघना.

त्याले पोटभर शिकार खावाले भेटनात. जीभ चाटत तो पाणीना शोधमा निघना. इकडे-तिकडे फिरावर त्याले एक छाकला तलाव दिखना. तो काठवर पाणी पेवाकरता गया. त्याच येळले एक डुकरन पिल्लु चिखलमा बराच येळपाईन खेळी राहिनत. अनी समोरना बाजुले ते बी पाणीमा घुशीन पाणी पेवाल लागन. त्यांनी जवय वाघले दख. जवय भ्याई गय. त्याले पळी जावान अनी स्वतःले वाचाडन शक्च नव्हते.

ईकडे वाघले इतनी तहान लागली व्हती कि, ते पिल्लु त्याले दखायनच नाही. वाघ पाणी पेवाले खाल वाकना, अनी पटकन मांगे फिरना. पाणी भलतच गढुळ व्हत अनी त्याले दखायनच नही. वाघ पाणी पेवाले खाल वाकना, अनी पटकन मांगे फिरना. पाणी भलतच गढुळ व्हतं अनी त्याले गंधापटक वास ई राहिना. त्या पिल्लांना आंगवरला चिख्खल पाणीमा मिसळी जायेल व्हता. वास तर इतला ई राहिना त्या पिल्लाना की ते पाणी सोडन वाघ दुसरीकडे पाणी

सोडीन वाघ दुसरीकडे पाणी शोधले निघन).
वाघनी हाई माघार दखीन ते पिल्लु पटिले गोंधळी गय. पण ते जरा धीट व्हत त्यामुळे त्याले वाटन की, वाघ मालेच घाबरना! तो इतला घाईमा त्या धाकला डुकरले आपण हत्तीनामायक शक्तीमान शोतस अन वाटन. ते वाघमांगे पळाले लागल. त्यांनी वाघले सांग, "वाघोबा दम्हां परत ईसिन मनासंगे देनहात करा; डरफुक कथाना पळी जाऊ नको!"
वाघले भलतीच तहान लागेल व्हती. त्याले आत्ते काय भांडानी ईच्छा नव्हती. बुसती मान मांगे वळाईन तो घुरघुरना, "मी आज तुनासंगे लढांव नही." याच येळले तु सकाळ आठे ये अनी मंग आपला सामना व्हई." पण पिल्लाले अस वाटन कि वाघ घाबरी गया म्हणीन तो नाटके करी राहीना! डुकरले आखो रव चडना अन तो गर्वतीन फुगी गया.
परतच घर जाईन त्यानी सर्वसिले सांगता सुटता कि, "वाघोबा माले घाबरस, म्हणजे आते तर मी जंगलना राजा व्हसु!" घरमधला सर्व डुकरसले बलाईन ह्यानी जे व्हयंन ते जसनातस सांग. त्या ऐकीसन थक्क व्हयनात. वाघीन तलावमधल पाणी का बर प्यायना नही अन तो तठेन का बर निघी गया व्हई. त्यानं कारण त्यासनी लगेल वळखं. त्या पिल्लाच्चे असा अगावपणा कराबद्दल सर्वाजन त्यानावर संतापणात. वाघले आव्हान दिसन आपण कितली मोठी चुक करी हाई डुकरले समजन. आते तर त्यांनी बोबडीच वळनी. दुसरा दिन वाघना जेवनकरता आपला बळी ठरेल शे अस त्याले वाटन. नातुनी हाई केविलवानी अवस्था दखीन त्यांना आजोबाले वाईट वाटन. त्यासनी एक योजना सांगी.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ② भाषेतील संवाद

समजा गावात आलेला पाहुण्याला गावकरी विचारतोय.

**गावकरी** :- केव्हा आलात ? कसं काय चाललंय तुमचं ?
**पाहुणा** :- आजच आलो सगळं मजेत तर ते म्हणतील
**गावकरी** :- चला मग आमच्या घरी चहा पाणी करू.
**पाहुणा** :- हा चला
**गावकरी** :- काय काम करता तुम्ही शहरात ?
**पाहुणा** :- कंपनीत आकांउन्टन आहे.

*तर मग ते कसं बोलतील*

गावकरी :- क्व्हळ उनात ? कसं चाली ऱ्हायनं !
पाहुणा :- आजच (चहान्च्या) बाकी मजामा शे !
गावकरी :- चला मंग आम्हना घर चहा पाणी ल्या.
पाहुणा :- हा चला,
गावकरी :- काय काम करतस तुम्ही तठे शाहरमा ?
पाहुणा :- कंपनीमा जसा मी.

पहिल्यांदाच जावाई येताहेत तुम्ही असं करा बाजारात जावून चांगले कपडे घेऊन या नीट बघून आणा, माझा भाऊ आला होता तेव्हा ते गोणपाट उचलुन आणत होत. तसं नका आणु म्हणजे बरं.

*मग ते कसे बोलतील*

पहिलाच सावा जपाई इन्हायनात. तुमुन असं करा बाजारमा जाइसन चांगला कपडा लई या,जरासा देखीदाखी लयजात, म्हणा भाऊ उन्हता तव्हय जे रस्क उचली लयन्यात तसं नका उचली लयंजात बरं. !

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ③ म्हणी व त्यांचे अर्थ.....

① अलता शहणा तैना बैल रिकामा :-
जो मनुष्य फार शहाणपणा करायला जातो, त्याचे मुळीच काम होत नाही.

② आंधय दयस कुत्र पीठ खास :-
एकाने काम करावे, दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा.

③ माय नि माया आणि पोरे जातीन वाया :-
फार लाड केले की मुल बिघडतात.

④ चार दिवस सासूना चार दिवस ववूना :-
प्रत्येकाला अनुकूल परिस्थिती येतेच.

⑤ अंधारामा कर आणि उजाय्यामा वन :-
कितीही गुप्तपणे एखादी गोष्ट केली तर ती कधीना कधी उजेडात येते.

⑥ काल्दीन मरना आज पित्तर धाला :-
अतिशय उतावळेपणाची वृत्ती.

⑦ काय नही त घाबरान कसाले :-
ज्याने किंवा गुन्हा किंवा वाईट गोष्टच केलीच नाही त्याने शिक्षा होण्याचे भय कशाला बाळगायचे.

⑧ चार जनसनी माय नि खाल्लावर जीव जाय :-
जबाबदारी अनेकांची असेल तर काळजी कोणीच घेत नाही.

⑨ आथा आड नि तथा हेर :-
दोन्ही बाजूने सारखीच अडचणीची स्थिती निर्माण होणे.

⑩ जास्त खावान म्हणखाईमा जावान :-
अतिखाणे नुकसानकारक असते.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ④ लोकगीते :-

## पेरणी

पेरणी पेरनी आले पावसाचे वारे बोलला पोपया पेर्ते व्हा रे
पेर्ते व्हा रे !

पेरनी पेरनी आभायात गडगड , वरस वरस माझ्या उरी
धडधड !

पेरनी पेरनी आता मिरून बी सरे . बोलेना पोपया पेर्ते
व्हा रे ! पेर्ते व्हा रे !

पेरनी पेरनी अवघ्या जगाच्या करानी ढोराच्या चारनी
कोटी पोटाची भरणी !

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# कवीता

दारू ढोसणार बाप
त्याले कोसणार माय
घर पोसणार आजा

घर वावर ताबे गान
आपल तरी परक शन
मायना डोकाले तान

कस दप्तर कस पुस्तक
शाळा कसाले छी दत्तक
विद्या पुढे नई झुकन मस्तक

खाली डबा खाली कणगी
घर झाडाई गे खणगी खुणगी
मायनी झाडले लिद्य तणगी.....

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# मानूस

मानूस,
मतलबी रे मतलबी मानसा,
तुले फार हाव
तुझी हाकाकेल आशा
मानसा मानसा
तुझी नियत बेकार
तुझ्याहून बर गोठ्यांतल जनावर
भरला डाडोद
भूलीसनी जाते सूद
खाईसनी चारा
गायम्हैस देते दुध
मतलबासाठी
मान मानूस डोलये
इमानाच्यासाठी
कुत्ता शेपूट हालये
मानसा, मानसा,
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस !

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# वारा (कविता).___

पारा म्हणे आते,...
जशी का भावले
इतभर पोट साठे
फिरे रान वने.___

चारी दिशा बकास
बकास रे छात्र छाया
माय ना पदर.___
पदर मा होती बहू माया.__

बाप शहस कठोर....
पहाड ना ओला झरा.
कथना तर ओटले लागता
सुटे हृदय मा ओला पाझरा

दूर देश ले, दूर तूना पक्षी...
माय घाले तूनी यादमा येरझारा
गोधडी भिजाई गई माय...
ओला डोयाना, मिटेत नई कासरा....

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# अहिराणी (कविता)....

नही देठ नाही पाला. नही डागा.
तरी म्हणी अहिराणीले सगा सोयरा.

नागा उघडाकडे नाही मलम.
तशी मनि आहिराणी
तिले लागस नही कलम

तांबूस मातीपर पडे,
पडे सोन्याचा सडा,
म्हनि आहिराणी इले,
लागस नही घोड.

आहिराणी आहिराणी, मनी
आहिराणी,
हितेम कानी बानी.

# ⑤ पक्ष्यांची नावे :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोर | = मोर | ११ | कोंमडी | = कोंबडी |
| २ | सुगरण | = सुगरण | १२ | गरुड | = गरुड |
| ३ | घुबेड | = घुबड | १३ | गिधाड | = गिधाड |
| ४ | बगडा | = बगळा | १४ | घार | = घार |
| ५ | सुतार | = सुतार | १५ | हंस | = हंस |
| ६ | कावळा | = कावळा | १६ | खंड्या | = खंड्या |
| ७ | चिमणी | = चिमणी | १७ | शहामरुग | = शहामृग |
| ८ | पोपट | = पोपट | १८ | साळुंख्या | = साळुंकी |
| ९ | पारडा | = पारवा | १९ | कोळीया | = कोकीळ |
| १० | पारवा | = कबुतर | २० | बुलबुल | = बुलबुल |

# ६ जनावरांची नावे :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | बैल | = बैल | ११ | मांजर | = मांजर |
| २ | गाय | = गाय | १२ | जिराफ | = जिराफ |
| ३ | म्हैस | = म्हैस | १३ | लांडगा | = लांगडा |
| ४ | घोड | = घोड | १४ | बेडुक | = बेडुक |
| ५ | अस्वल | = अस्वल | १५ | चित्ता | = चित्ता |
| ६ | वाघ | = वाघ | १६ | मगर | = मगर |
| ७ | सिंह | = सिंह | १७ | उंट | = उंट |
| ८ | उंदिर | = उंदिर | १८ | हरिण | = हरण |
| ९ | सस | = ससा | १९ | साप | = साप |
| १० | वांदर | = माकड | २० | हत्ती | = हत्ती। |

# ७ फळांची नावे :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबा | = आंबा | ११ | चिकुक | = चिकू |
| २ | केळी | = केळे | १२ | दराक्ष | = द्राक्ष |
| ३ | अननस | = अननस | १३ | संतरी | = संत्री |
| ४ | सफरचंद | = सफरचंद | १४ | डाथिम | = डाळिंब |
| ५ | जामूळ | = जांभुळ | १५ | नारय | = नारळ |
| ६ | टरब्बुज | = कलिंगड | १६ | जाम | = पेरु |
| ७ | निंबु | = लिंबु | १७ | पेपुइ | = पपई |
| ८ | डांगर | = खरबुज | १८ | रामफय | = रामफळ |
| ९ | बोरे | = बोरं | १९ | आवया | = आवळा |
| १० | शिताफय | = सिताफळ | २० | मोरंबी | = मोसंबी |

FOR EDUCATIONAL USE

# ४ ऋतुंची नावे

| नंदुरबारी भाषा | मराठी भाषा |
|---|---|
| उन्हाया | उन्हाळा |
| पावसाया | पावसाळा |
| हिवाया | हिवाळा |

## ९ भाज्यांची नावे :-

| नंदुरबारी भाषा | मराठी भाषा |
|---|---|
| ९ टमारट = | टोमॉटो |
| २ वांग | वांगे |
| ३ कारल | कारले |
| ४ बटाट | बटाटे |
| ५ मुया | मुळा |
| ६ कोथमेर | कोंथिंबीर |
| ७ भोपळ्या | भोपळा |
| ८ पोक्या | पोकळा |
| ९ गिलक | गिलके |
| १० दोडक | दोडके. |

# भाषेचे महत्व......

आपण ज्या भाषेमध्ये बोलतो त्या संवाद म्हणतात. आणि संवाद प्रभावी माध्यम आहे बोलणारे आणि ऐकणारा यांचा जो मुख्य असतो त्याला म्हटल म्हणजे बोलण.

भाषेमुळे आपल्याला जीवन व्यवहार कळले जातात. आणि सुखीत होऊन जातात किंवा एखादया पर्यंत आपण अभ्यास करत राहतो तिथे भाषा आपल्याला नेहमीच साथ देत राहते. तिथे भाषा आपल्या विकासासाठी आपल्याला भाषा आयुष्यभर मदत करते. व्यक्तीच्या विकासबरोबर समाजाच्या विकाससुद्धा भाषे-मुळेच होत असतो. आणि हीच भाषा आपल्याला समाजामध्ये विचारवंत, तत्वज्ञ, लेखक, कवी यांचा सहभाग करुन घेण्यासाठी विकासामध्ये आपल्याला मोठे योगदान देत असते. भाषाच योगदान विविध लहान-मोठे कामे संस्कृती मध्ये माय मराठी, माय भाषा माध्यमातुन विकसीत झालेली आहे. अगदी शालेय जीवनापासुन महा-विदयालयीन जीवनापर्यंत आणि दररोज आपल्या बोली भाषणा-साठी भाषा आवश्यक असते.

"आपण आपल्या घरामध्ये याच भाषेने बोलतो त्याला मातृ-भाषा म्हणतात." इतर कोणत्याही पशु-पक्ष्यांना ही दैवीशक्ती न देता ईश्वरशक्ती मनुष्याला बहाल केली आहे. भाषेच्या माध्यमादवारे आपल्या भावभावना समोरच्यापर्यंत पोहचवणे. विचार, कल्पना व आलेले अनुभव भाषेदवारा व्यक्त करतो. अत्यंत आनंददायी व दुःखा-च्या क्षणी आपण भाषेचा आधार घेतो. भाषेच्या बलावर रामायण, महाभारत, बायबल असे ग्रंथ रचले. हे ग्रंथ आजही आपली अस्तीत्व टिकवून राहते. अनेक भाषा शिकवल्यामुळे नवनवीन शब्द आमच्यात केले. आपला बौद्धिक विकास होतो. असे अनन्यसाधारण भाषेचे महत्व आपल्याला दिसुन येते.

## १०. सण व उत्सव



आदिवासी होळी.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

10] आदिवासी उत्सव :-



Sundaram®
FOR EDUCATIONAL USE



गणेशउत्सव



नवरात्री उत्सव

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

* दिवाळी *





गुढीपाडवा

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# कानबाई माता उत्सव






# समारोप

आपण आजवर फक्त मराठी, इंग्रजी, हिंदी, व संस्कृत या भाषाशीच परिचयीत होती. मात्र आपल्या भारतात नव्हे तर जवळच्याच प्रदेशात किती अनेक भाषा बोलल्या जातात. हे समजले. आपल्याला अनेक बोलीभाषेची माहिती झाली त्याचा उगम त्याचा विकास कसा झाला. आपल्या परिसरात राहणारे किती जण ही भाषा बोलला हे ही समजले माहिती मिळवणे अवघड होते. पण बोलीभाषा ह्या आपल्या कोणत्या भाषेचा प्रभाव त्यावर आहे. हे समजले भाषा ही किती महत्त्वाची तसेच तिची कोणकोणती वैशिष्ट्ये आहेत. तसेच या बोलीभाषेचा इतिहास किती जुना आहे, हेही पाहिले.

कोणतीही भाषा कमी किंवा जास्त महत्त्वाची असे काही नसुन त्या त्याप्रदेशातील लोकांचे प्रभुत्व त्यांच्या त्यांच्या भाषेवर असते. बोलीभाषा ही दर १५ किमी वर बदलते. त्यात हावभाव बोलण्याची पद्धत ही वेगवेगळी असते. हे या प्रकल्पाद्वारे लक्षात आले. हा प्रकल्प करतांना बऱ्याच माहिती झाली आपल्या भाषेतील व बोलीभाषातेल फरक समजण्यास सोपे झाले. बोलीभाषा ही व्यक्ती व्यक्ती नुसार बदलु शकते.. तीथल्या प्रदेशिक बोलीभाषेचा परिणाम झालेला दिसुन येतो. अशाप्रकारे मी या विषयाचा भाषा व त्याच्या माहित्या घेतल्या.

Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की , बी.एड. प्रथम वर्ष विद्यार्थी जोशी मयुरी विजय रोल नं.५६ यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पेपर PE-3 अभ्यासक्रमांतर्गत भाषा आणि ज्ञान व अभ्यासक्रम या विषयांतर्गत प्रात्यक्षिक कार्य महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चाळीसगाव या अभ्यास केंद्रात विषय प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पुर्ण केले आहे.

या करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण - चाळीसगाव

दिनांक - 10/04/2023

विषय प्राध्यापक